महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

ठाणे येथील निसर्गरम्य येऊर परिसराचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याबाबत

(१) ६५३८७ (१६-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील निसर्गरम्य येऊर परिसराचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्यासंदर्भातील प्रस्ताव ठाणे महापालिकेने माहे सप्टेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात वन विभागाकडे पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-११-२०१७) :(१) हे खरे नाही.

नगर अभियंता, ठाणे महानगर पालिका, ठाणे यांनी येऊर येथे पर्यटन केंद्र विकासित करणेकामी वन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली होती.

केंद्र शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार येऊर येथे पर्यटन केंद्र विकसित करण्यापूर्वी राज्य / राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने विहित प्रपत्रात प्रस्ताव ऑनलाईन सादर करुन त्याची एक प्रत मुख्य वनंसरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचेकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये सादर केला आहे.

(२) येऊर येथे पर्यटन केंद्र विकसित करण्यासाठी प्रस्तावितअसलेल्या क्षेत्राची ठाणे महानगरपालिका व वन विभाग यांचेमार्फत स्थळनिहाय पाहणी करुन संबंधित यंत्रणेमार्फत आवश्यक ती पूर्तता करुन सदर प्रस्ताव राज्य / राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूरच्या सीपीआरअंतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकिय महाविद्यालयाच्या वतीने अपंग नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत

(२) ६६९७१ (१६-१२-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरच्या सीपीआरअंतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकिय महाविद्यालयाच्या वतीने अपंग नागरिकांची गैरसोय होत असल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच अन्य कामकाजांसाठी अपंग नागरिकांना अपंगत्वाचा ऑनलाईन दाखला आवश्यक असल्याने उक्त रुग्णालयात रुग्णाशिवाय दाखल्यासाठी प्रचंड गर्दी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले

(४) तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) लागू नाही.

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या साहित्य व औषधांची खरेदी दर कराराची मुदत संपूनही खरेदी झाली नसल्याबाबत

(३) ६८३८१ (१६-१२-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेडिकल, मेयो सुपरस्पेशालिटीसह वैद्यकीय शिक्षण विभागाच्या राज्यातील सगळ्या शासकीय रुग्णालयांतील बऱ्याच महागड्या शस्त्रक्रियाचे साहित्य व औषधांची खरेदी गेल्या सहा महिन्यांपासून दर कराराची मुदत संपल्यावरील खरेदी न झाल्याने रखडल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर कराराची मुदत संपूनही नुतनीकरण झाले नसल्याने याचा सर्वाधिक नुकसान मेडिकल, मेयो, सुपरच्या रुग्णांचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले, तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१७) : (१) हे खरे नाही. वैद्यकीय शिक्षण संचालनालयामार्फत औषधी, डायगोस्टिक किट्स, रसायने, सर्जिकल ड्रेसिंग, सलाईन, इंजेक्शन इत्यादी १२५७ बाबींचे दरकरार करण्यात आलेले आहेत तसेच सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी लागणाऱ्या काही सर्जिकल साहित्यांची खरेदी ही बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या दरकरार, ई.एस.आय.सी व डी.जी.एस ॲण्ड डी इत्यादी दरकरारावर व काही सर्जिकल साहित्याची खरेदी ही संस्थास्तरावर दरपत्रके मागवून विहित पद्धतीने करण्यात येते. त्यामुळे माहे सप्टेंबर २०१६ या काळात मेयो, सुपरस्पेशालिटी व इतर रुग्णालयात औषधी व सर्जिकल साहित्याअभावी कोणत्याही प्रकारच्या शस्त्रक्रिया रखडलेल्या नाहीत. रुग्णसेवेवर परिणाम न होता सर्व रुग्णालयात शस्त्रक्रिया सुरळीत चालू आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

राज्यात पाणीटंचाईच्या काळात उद्योगांवर कायम पाणीकपातीचे संकट येत असल्याने पिण्याच्या पाण्यानंतर शेतीएवेजी उद्योगांना प्राधान्याने पाणी देण्याबाबत

(४) ६९९६५ (२७-०१-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाणीटंचाईच्या काळात उद्योगांवर कायम पाणीकपातीचे संकट येत असल्याने पिण्याच्या पाण्यानंतर शेतीएवेजी उद्योगांना प्राधान्याने पाणी देण्याची सूचना राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बैठकीत काय निर्णय घेण्यात आला आहे तसेच उद्योग व शेती व्यवसायाला समन्यायी पाणीपुरवठा करण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१२-१२-२०१७) : (१) नाही.

(२) उद्योग व शेती व्यवसायाला समन्यायी पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने दि.१७/११/२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बोरिवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे वनसंरक्षक यांनी येऊर व गोखिवरे परिक्षेत्र वनाधिकारी यांनी आदिवासींना जंगलात जाण्यास बंदी घातल्याबाबत

(५) ७४९८४ (१५-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे वनसंरक्षक तथा संचालक यांनी येऊर व गोखिवरे परिक्षेत्र वनाधिकारी यांनी आदिवासीना जंगलात जाण्यास बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याविरोधात आदिवासी बांधवांनी दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजीच्या सुमारास सत्याग्रह केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बंदी मुळे आदिवासी बांधवाचे जीवन विस्कळीत झाले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-११-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान सभोवतालच्या १ कि.मी. पेरिफेरीत धरणे, मोर्चा, आंदोलन करण्यास मनाई असल्याचे आदेश मा. उच्च न्ययालयाने रिट याचिका क्रमांक ३०५/९५ मध्ये दिनांक २६.०४.२००० रोजी पारीत केले आहेत.

आदिवासींच्या समस्यांसंदर्भात श्री. विवेक पंडीत, विधान सभा सदस्य यांनी त्यांचे शिष्टमंडळासह मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांची कार्यालयात दिनांक १४.१२.२०१६ रोजी भेट घेवून चर्चा केली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर-रामटेक येथील पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या आजूबाजूच्या गावांना शेतीच्या सिंचनाकरिता तलाव व नाल्यातील पाणी देण्याबाबतचा प्रस्ताव

(६) ७८२२० (१५-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-रामटेक विधानसभा क्षेत्रातील पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या आजूबाजूच्या गावांना शेतीच्या सिंचनाकरिता तलाव व नाल्यातील पाणी देण्याबाबतच्या प्रस्ताव वन विभागाकडे माहे मार्च २०१६ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-११-२०१७) :(१) हे खरे नाही.

पेंच व्याघ्र प्रकल्पाचे बफर झोन मध्ये रामटेक तहसिल अंतर्गत २५ गावांचा व पारशिवणी तहसिल अंतर्गत २३ गावांचा समोवश होतो. पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या आजुबाजूच्या गावांना शेतीच्या सिंचंनाकरीता तलाव नाल्यातील पाणी वापरण्यास कोणतीही बंदी घालण्यात आलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

नियमबाहय पध्दतीने प्रवेश देत असलेल्या महाविदयालयांवर कारवाई करण्याबाबत

(७) ८२५२८ (१८-०४-२०१७). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे मा.मुख्यमंत्री यांनी वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशाच्या प्रवेशासाठी नियमांची पायमल्ली करून श्रीमंत व्यक्तींना नियमबाहय पध्दतीने प्रवेश देत असलेल्या महाविद्यालयांवर फौजदारी करण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण हे सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणून विद्यार्थ्यांना प्रवेश हा पैशांवर नव्हे तर त्यांच्या गुणवत्तेवर मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही महाविदयालये प्रवेशासाठी पैसे घेत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त असून त्यांच्यावर कारवाई करण्याची परवानगी मा.वैदयकीय शिक्षण मंत्री यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास आतापर्यंत किती वैदयकीय महाविदयालयांवर कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-१२-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) सन २०१६-१७ पासून राज्यातील शासकीय, महानगरपालिका आणि खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम महाविद्यालयांचे प्रवेश आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेमार्फत एकत्रित समुपदेशन प्रक्रियेद्वारे गुणवत्तेच्या आधारे करण्यात येत आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जायकवाडीवरील पक्षी संवर्धनाकडे वन्यजीव विभागाचे दुर्लक्ष झाले असल्याबाबत

(८) ८२६७९ (१५-०४-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडीवरील पक्षी संवर्धनाकडे वन्यजीव विभागाचे दुर्लक्ष झाले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ४ वर्षांपासून या परिसरात मानवी हस्तक्षेप वाढल्यामुळे, विनापरवानगी मासेमारी व इंधन मशिनचे ध्वनीप्रदुषण यामुळे जलाशयावरील पक्ष्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला असून त्यांच्या संवर्धनासाठी विशेष मदत म्हणून वन्यजीव विभागाला मागील ४ वर्षांपूर्वी देण्यात आलेला २ कोटी रुपयांचा निधी अद्यापही खर्च करण्यात आलेला नाही, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत तसेच शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-११-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) संत ज्ञानेश्वर उद्यानात करण्यात आलेल्या प्रगणनेनुसार जलाशयावरील पक्ष्यांना धोका निर्माण झाला असल्याचे दिसून येत नाही. संत ज्ञानेश्वर उद्यानाचे १२५.५० हेक्टर क्षेत्र वगळण्यासाठी केंद्रीय उच्चाधिकार समिती व मुख्य वन्यजीव रक्षक यांच्या शिफारसीने राष्ट्रीय वन्यजीव मंडळानी काही अटींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे.

सदर अटींपैकी निसर्ग निवर्चन केंद्र उभारयासाठी पाटबांधारे विभागाने रु. २०१.९२ लक्ष रक्कम विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), औरंगाबाद यांचेकडे जमा केली आहे. त्यापैकी रु. ४.३६ लक्ष हे प्राथमिक कामांसाठी खर्च करण्यात आले असून उर्वरित रक्कमेच्या अनुषंगाने आवश्यक ती योजना बनवून तांत्रिक बाबींची पूर्तता करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्व शासकीय वैद्यकिय महाविद्यालय आणि रुग्णालयांमध्ये उपलब्ध रुग्णखाटांच्या प्रमाणात अध्यापक वर्ग आणि विद्यार्थी संख्या वाढविण्याबाबत.

(९) ८५५९८ (११-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय वैद्यकिय महाविद्यालय आणि रुग्णालयांमध्ये उपलब्ध रुग्णखाटांच्या प्रमाणात अध्यापक वर्ग आणि विद्यार्थी संख्या वाढविण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा कृती अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, या अहवालानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१०-१२-२०१७) : (१) होय.
(२), (३) व (४) या संदर्भात संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी प्रस्तावित केल्यानुसार आवश्यक पदांच्या निर्मितीची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

राज्यातील बालविवाह, बालविधवा, बाल घटस्फोटिता, बालविवाहामधून होणारे कुपोषण

(१०) ८५७५५ (१६-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बालविवाह, बालविधवा, बाल घटस्फोटिता, बालविवाहामधून होणारे कुपोषण यासंदर्भात अभ्यास करुन उपाययोजना सुचवण्यासाठी उच्चस्तरीय अभ्यास समिती नियुक्त करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ च्या दुस-या आठवड्यात एका निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री आणि कामगार कल्याण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०८-१२-२०१७) : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील १८५ अंगणवाडीना इमारत नसलेबाबत

(११) ८५९२५ (१६-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सुमारे १८५ अंगणवाडीना स्वत:ची इमारत नसल्याचे निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय
(२) असल्यास, तालुक्यातील अनेक अंगणवाडी खाजगी जागेत, समाज मंदिरात तर प्राथमिक शाळेत भरत आहेत. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, पावसाळ्यात शिक्षण घेणे अडचणीचे जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन तातडीने शाहुवाडी तालुक्यातील अंगणवाड्यांना स्वतंत्र जागा देण्याची कार्यवाही करणार आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) : (१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) शाहुवाडी साठी अंगणवाडी केंद्र बांधकामास जागा मिळविण्याची कार्यवाही सुरु असून जिल्हा नियोजन समितीकडून ५० बांधकामांना निधी मंजूर झालेला आहे. सदरची कामे मार्च, २०१८ पर्यत पूर्ण होणार आहेत त्यामध्ये शाहुवाडी गटातील अंगणवाडी केंद्राचा समावेश आहे.

नवी मुंबई खारघर हिलवरील प्रसिध्द पांडवकडा धबधब्यावर वनविभागाने बंदी घातल्याबाबत

(१२) ८६०४८ (१६-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई खारघर परिसरातील सिडको प्रशासनाने विकसित केलेल्या खारघर हिलवरील प्रसिध्द पांडवकडा धबधब्यावर दिनांक १५ जून २०१७ पासून पर्यटक व निसर्ग प्रेमींना वनविभागाने बंदी घातली असल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी पावसाळयात नैसर्गिक वातावरण उत्तम असल्याने मोठया प्रमाणात पर्यटक व निसर्ग प्रेमी येत असल्यामुळे पांडवकडा परिसरातील चाफेवाडी व फणसवाडी या आदिवासी बांधवांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बंदी उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-११-२०१७) : (१) हे खरे आहे.
पनवेल वनपरिक्षेत्रामध्ये पांडवकडा धबधबा असून सदर ठिकाणी दरवर्षी पावसाळ्यामध्ये हजारोंच्या संख्येने पर्यटक भेट देत असतात व त्या ठिकाणी पावसाचा व पाण्याचा अंदाज न आल्याने मागील काही वर्षापासून काही पर्यटकांचा अपघाती मृत्यू होण्याच्या व पर्यटक जखमी होण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे सदरचा धबधबा हा धोकादायक असल्याने व सदर राखीव वनाचे व वनसंपत्तीचे कोणतेही नुकसान होवू नये याकरिता सदर ठिकाणी पर्यटकांना बंदी घातलेली आहे.
(२) हे खरे नाही. सदर ठिकाणी चाफेवाडी व फणसवाडी येथील आदिवासी बांधवांना रोजगार उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) सदर ठिकाणी येणा-या पर्यटकांकरीता सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून धबधब्याच्या परिसरात संरक्षित कठडे, ठिक-ठिकाणी रेलिंग व लोखंडी ब्रिजेस, गार्डन व लहान मुलांसाठी खेळण्यासाठी सुविधा तसेच पर्यटकांसाठी चेंजिंग रुम सुविधा व रस्ते इ. सुविधा उपलब्ध करुन देण्याचे विचाराधीन असुन त्या उपलब्ध करुन दिल्यानंतर बंदी उठविण्याबाबत विचार करता येईल.

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या अंगणवाडयांना मंजुरी देऊनही जिल्हयातील १००० अंगणवाडयांना अदयाप हक्काची इमारत नसल्याबाबत

(१३) ८६२६५ (१६-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हापरिषदेने गावोगावी अंगणवाडयांना मंजुरी देऊनही जिल्हयातील १००० अंगणवाडयांना अदयाप हक्काची इमारत नसल्याची बाब दिनांक २५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडयांना इमारती मिळत नसल्यामुळे मिळालेला निधीही परत जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीचा ७० लाखांचा निधी अखर्चित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने संबंधित अंगणवाडयांना इमारतीसाठी नवीन भुखंड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(५) असल्यास, संबंधित अंगणवाडयांना जागा न मिळण्याची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे, अंगणवाडी इमारत बांधकामास सहजासहजी व पुरेशी जागा उपलब्ध होत नाही, तसेच काही ठिकाणी जागेबाबत स्थानिक वाद उद्भवतात इत्यादी कारणेमुळे काही प्रमाणात निधी अखर्चित राहतो.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी भुखंड स्थानिक ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असेल तर किंवा स्थानिक रहिवाशाकडून बक्षिसपत्राद्वारे जागा मिळाली तर त्या जागेवर इमारत बांधण्यात येते. जागा खरेदी करुन अंगणवाडी बांधकाम करण्याचे शासनाचे धोरण नाही.

(५) बांधकामासाठी आवश्यक असलेले क्षेत्रफळानुसार जागा उपलब्ध न होणे, उपलब्ध जागेबाबत स्थानिक गावपातळीवर मालकी हक्क / वहीवाट, इत्यादी बाबत वाद निर्माण होणे, ग्रामपंचायतीकडे स्वत:ची पुरेशी जागा नसणे, बक्षिसपत्र करुन घेणेस ग्रामपंचायतीकडून विलंब होणे, विजेचे खांब / तार आडव्या आल्यामुळे तसेच इत्यादी कारणांमुळे अंगणवाडी इमारतीचे बांधकामे होऊ शकत नसल्यामुळे सदर कामे रद्द होऊन निधी अखर्चित राहतो.

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शुल्क रचनेवरुन राज्यातील ९ खासगी महाविद्यालय आणि शासन यांच्यात निर्माण झालेला वाद

(१४) ८७७६७ (११-०८-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शुल्क रचनेवरुन राज्यातील ९ खासगी महाविद्यालय आणि शासन यांच्यातील वाद मिटला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या महाविद्यालयातील किती जागा राज्याच्या नियंत्रणाखाली केंद्रीभूत प्रवेश प्रकियेतून भरल्या जाणार आहेत व पहिल्या प्रवेश फेरीत रिक्त राहिलेल्या जागांकरिता दुसरी ऑनलाईन प्रवेश फेरी न राबविता त्या ऐवजी वैयक्तिक समुपदेशनाच्या माध्यमातून सदर रिक्त जागा भरण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व उक्त निर्णय घेण्याची कारणे काय आहेत तसेच ९ महाविद्यालये आणि शासन यांच्यातील निर्माण झालेला तिढा सुटल्याने वैद्यकीय पव्युत्तर अभ्यासक्रमासाठी किती जागा वाढल्या आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-१२-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत दिनांक २९ मे,२०१७ ते ३१ मे,२०१७ या कालावधील वैयक्तिक प्रवेश फेरी (MOP UP ROUND) घेवून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. सदर प्रवेशासाठी एकूण ४३६ जागा उपलब्ध झाल्या होत्या.

करमाळा तालुक्यात (जि.सोलापूर) तालुक्यात ३७२ अंगणवाड्यांपैकी १५९ मोठ्या व मिनी अंगणवाड्यांना इमारती नसल्याबाबत

(१५) ८७९४९ (१६-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यात ३७२ अंगणवाड्यांपैकी १५९ मोठ्या व मिनी अंगणवाड्यांना इमारती नसल्याने शासनाने इमारती द्याव्यात अशी मागणी करमाळा पंचायत समिती सदस्यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मीक बालविकास योजनेंतर्गत सुरु असलेल्या मोठ्या व मिनी अंगणवाड्यांसाठी इमारती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावरील निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) अद्याप मागणीच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) : (१) करमाळा तालुक्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत २८१ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून त्यापैकी २४२ अंगणवाडी केंद्रांना स्वतंत्र इमारत उपलब्ध असून ३९ अंगणवाडी केंद्रांना स्वतंत्र इमारत उपलब्ध नाही. तसेच ९१ मिनी अंगणवाडी केंद्र सुरु असून केवळ १ मिनी अंगणवाडी केंद्रास स्वतंत्र इमारत उपलब्ध आहे. अशाप्रकारे करमाळा तालुक्यात ३९ अंगणवाडी केंद्र व ९० मिनी अंगणवाडी केंद्र अशा एकूण १२९ अंगणवाडयांना स्वत:ची इमारत उपलब्ध नाही.

(२) स्वतंत्र इमारत नसणाऱ्या ३९ अंगणवाडी केंद्रांना इमारत बांधकाम मंजूर करणेकामी जागा उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही सुरु असून जागा उपलब्ध झाल्यानंतर जिल्हा नियोजन मंडळ तसेच मनरेगा या योजनेमधून सदर अंगणवाडी केंद्रासाठी इमारत बांधकाम मंजूर करणेबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच मिनी अंगणवाडी केंद्रासाठी इमारत बांधकाम मंजूर करणेबाबत केंद्र शासनाचे कोणत्याही प्रकारच्या मार्गदर्शक सूचना नसल्यामुळे सदर मिनी अंगणवाडी केंद्र प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत इमारत तसेच ग्रामपंचायतीकडील इतर उपलब्ध इमारतीमध्ये सदर मिनी अंगणवाडी केंद्र भरवणेबाबत संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मध्य महाराष्ट्र व विदर्भातील दुर्गम भागात गैरहजर राहणा-या २७ डॉक्टरांवर आरोग्य संचालनालय बडतर्फीची कारवाई करण्याबाबत

(१६) ८८३९८ (१९-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य महाराष्ट्र व विदर्भातील दुर्गम भागात गैरहजर राहणा-या २७ डॉक्टरांवर आरोग्य संचालनालय बडतर्फीची कारवाई करणार असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (०२-११-२०१७) : (१) होय हे अंशतः खरे आहे.

(२) २६ अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिका-यांबाबत सेवासमाप्तीची कारवाई शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) २६ वैद्यकीय अधिका-यांसंदर्भात वृत्तपत्रात त्यांच्या सेवासमाप्तीबाबत नोटीस प्रसिध्द करुन त्यांना १५ दिवसांत त्यांचा खुलासा सादर करण्याची संधी देण्यात यावी व त्यांनी विहीत मुदतीत खुलासा सादर न केल्यास त्यांच्या सेवासमाप्तीची एकतर्फी कारवाई करण्यात येईल, असे नमूद करणारी नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी, अशा सूचना आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई या कार्यालयास दि. २१.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिल्या आहेत.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

चांदूर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील वनातील मार्ग व पुल या लेखाशिर्षातंर्गत दिपोरी येथील पुलाचे काम निकृष्ट केल्याबाबत

(१७) ८८८९१ (१६-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील वनातील मार्ग व पुल या लेखाशिर्षातंर्गत दिपोरी येथील पुलाचे काम निकृष्ट केले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर कामाची चौकशी समितीकडून करण्यात यावी यासाठी मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास उप वनसंरक्षक, अमरावती यांना लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर निष्कृष्ट काम केल्याप्रकरणी दोंषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, निलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-११-२०१७) : (१) चांदूर रेल्वे परिक्षेत्रात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत वनातील मार्ग व पूल (४४०६ ३३३९) या लेखाशिर्षांतर्गत दिपोरी ते वडगाव रस्त्यावरील पुलाच्या कामाच्या (रु. ४८२५३८/- अंदाजपत्रकीय रक्कमेच्या) ई निविदा मागविण्यात येऊन त्यानुसार श्री. देवेंद्र भैसे या कंत्राटदाराने अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा कमी रकमेची म्हणजेच रु. ४१२५२२/- ची निविदा दाखल केल्यामुळे त्यांना सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. त्यानुसार काम सुरु होऊन मंजूर अंदाजपत्रक व नकाशानुसार काम पुर्ण करुन सदर कामाचे मोजमाप पुस्तिकेत नोंद घेऊन काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे. सदर कामाची चौकशी त्रयस्थ यंत्रणेकडून करण्यात यावी यासाठी मा. स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २६/५/२०१६ रोजी उप वनसंरक्षक, अमरावती यांना लेखी पत्र दिले आहे.

(३) व (४) सदर कामाचे त्रयस्थ ऑडीट करण्याकरिता प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी कॉलेज, अमरावती यांना कळविण्यात आले आहे.

वसई व तलासरी (जि. पालघर) तालुक्यातील अंगणवाड्याच्या इमारती धोकादायक अवस्थेत असलेबाबत

(१८) ८८८९९ (१६-०८-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील कामण गावातील नंबर १ ची अंगणवाडी मोडकळीस आली असून अंगणवाडीतील बालकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच तलासरी (जि.पालघर) तालुक्यात एकात्मिक बालविकास प्रकल्पाअंतर्गत गावात तसेच खेड्या-पाड्यात २० ते २५ वर्षापूर्वी बांधलेल्या अंगणवाड्याच्या इमारतीची दुरुस्ती केलेली नाही अशाच इमारतीत बालकांना पोषण आहार दिला जात असल्याचे दिनांक ५ जून, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडे गेल्या काही वर्षापासून वारंवार पाठपुरावा करुनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंगणवाडीची दुरवस्था दूर करण्याबाबत तसेच बालकांना योग्य विद्यादान मिळण्याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) :(१) वसई (ता.वसई, जि.पालघर) तालुक्यातील कामण गावातील कामण १ ची अंगणवाडी केंद्र स्वतंत्र इमारत नसून ही अंगणवाडी ग्रामपंचायतच्या समाजमंदीरच्या इमारतीत भरत होती. १ मे, २०१७ पुर्वी समाजमंदिर मोडकळीस येत असल्याचे लक्षात येताच तेथील अंगणवाडी केंद्र हे गावातील दत्तमंदिरमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे. त्यामुळे बालकांच्या जीवितास कोणत्याही प्रकारचा
(२) तलासरी तालुक्यात एकूण १८ नादुरुस्त अंगणवाडी आहेत व ३ अंगणवाडी जमीनदोस्त झालेल्या आहेत. या नादुरुस्त अंगणवाडी ठिकाणी अंगणवाडी भरविण्यात येत नाहीत. या २१ अंगणवाडयांपैकी ११ अंगणवाडी जिल्हा परिषद शाळेत भरविण्यात येत आहेत. ५ अंगणवाडी समाजमंदिर मध्ये ३ अंगणवाडी खाजगी जागेत १ अंगणवाडी ग्रामपंचायत इमारतीत व १ अंगणवाडी बचत गट बहुउद्देशिय हॉल मध्ये भरविण्यात येत आहेत. या ठिकाणीच अंगणवाडीतील बालकांना पोषण आहार दिला जात आहे.
(३) तलासरी व वसई तालुक्यातील धोकादायक व नादुरुस्त असलेल्या अंगणवाडी इमारती स्थलांतरीत करण्यात आल्या आहेत. त्यामुळे याबाबत दुर्लक्ष करण्यात आलेले नाही.
(४) महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत कार्यक्षेत्रातील अंगणवाडी केंद्र दुरुस्ती / नविन बांधकाम त्यांचे स्तरावरुन करणेत यावे याबाबत पत्रव्यवहार केला आहे. तसेच सद्य:स्थितीत नविन अंगणवाडी बांधकाम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजनेअंतर्गत करणेचे असलेने, अंगणवाडी केंद्र इमारतींची बांधकामे करणेसाठी प्रस्ताव तयार करणेबाबत आयुक्त स्तरावरुन कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बासंबा (ता.जि.हिंगोली) येथील अंगणवाडीची दुरवस्था

(१९) ८८९९३ (१६-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बासंब (ता.जि.हिंगोली) येथे बांधण्यात आलेली अंगणवाडी वर्ग पूर्णपणे कोसळली असून तेथील अंगणवाडी सेविका गत ६ महिन्यांपासून केंद्रीय प्राथमिक शाळेच्या वर्गखोलीत भरत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अंगणवाडी समोरील हातपंप बंद पडला असून येथील बालकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथे नव्याने अंगणवाडी उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) : (१) व (२) अंगणवाडी केंद्रासमोर असलेल्या हातपंपाची पाणी पातळी कमी झाल्याने हातपंप बंद पडलेला होता. त्या कालावधीत पोलीस स्टेशन आवारात असलेल्या हातपंपावरुन व खाजगी बोअर वरुन अंगणवाडी केंद्रातील बालकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आल्याने अंगणवाडीतील बालकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली नव्हती. तसेच आज रोजीला सदर हातपंपाच्या पाणीपातळीमध्ये वाढ झालेली असून हातपंप दुरुस्त केलेला आहे.
(३) मौजे बासंबा, ता.जि.हिंगोली येथील अंगणवाडी केंद्र क्र.३ ची इमारत मोडकळीस आल्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी हिंगोली यांचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी दिनांक ६/०८/२०१५ च्या पत्रान्वये गट विकास अधिकारी पंचायत समिती हिंगोली यांना सदरची इमारत दुरुस्त करण्यासाठी लेखी स्वरुपात कळविण्यात आले होते. त्यानुसार गट विकास अधिकारी पंचायत समिती हिंगोली यांनी दिनांक २१/६/२०१७ च्या पत्रान्वये सदरची अंगणवाडीची इमारत ही दुरुस्ती योग्य नसून वापरण्यास धोकादायक असल्याचे कळविले असून त्या जागी नविन अंगणवाडी इमारत प्रस्तावित करण्यात यावी, असे कळविले आहे.
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे आदेश दिनांक ११/०३/२०१६ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजना बळकटीकरण व पुनर्संरचना योजनेअंतर्गत नवीन अंगणवाडी इमारत बांधकामाकरीता हिंगोली जिल्हयासाठी रु.७,५९,३७,५००/- एवढया निधीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिवरे (ता.पारोळा, जि.जळगांव) येथे जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागांतर्गत जलयुक्त योजनेतून सिमेंट नाला बांधबाबत

(२०) ८९२८२ (२८-०८-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवरे (ता.पारोळा, जि.जळगांव) येथे जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागांतर्गत जलयुक्त योजनेतून सिमेंट नाला बांध मंजूर करण्यात आलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाला बांधाचे कामासंदर्भात शेतकऱ्याने संबंधिताकडे तक्रार वजा अर्ज केलेला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रार वजा अर्ज असतानाही तसेच नालाबांधाचे काम न करताही रु. ७ लाख रुपये संबंधित कंत्राटदाराला संगनमताने अदा करण्यात आलेले आहेत, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी असणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (१३-११-२०१७) :(१) हे खरे नसुन शिवरे ता. पारोळा जि. जळगांव येथे जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागाअंतर्गत जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सिंमेंट नाला बांधण्याचे कोणतही काम करण्यांत आलेले नसुन, पाझर तलाव दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाने राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व सदस्य नेमण्याबाबत

(२१) ८९३०२ (१६-०८-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अनिल कदम (निफाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाने राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व सदस्य नेमण्यासाठी दिनांक २१ जुलै, २०१६ मध्ये वा त्यासुमारास नामांकने मागविण्याची जाहिरात दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जाहिरातीत अध्यक्ष वा सदस्यांविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा असू नये तसेच कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असू नये अशीही अट त्यात घातली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील जाहिरातीत दोन्ही अटी डावलून राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष पदाची शासनाने नियुक्ती केल्याचे माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू आयोगावर नियुक्त केलेल्या अध्यक्षांवर बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भादंवि कलम ४७, १४३, ३५३ आणि ३३२ अन्वये गुन्हे आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन पुढे कोणती कारवाई केली आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (०८-१२-२०१७) : (१) हे खरे आहे.
(२) सदर जाहिरातीमध्ये अध्यक्ष व सदस्य कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधीत असू नये, अशी अट घालण्यात आलेली नाही. मात्र कोणताही फौजदारी गुन्हा नसावा, अशी अट होती. तथापि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, नियम २०१० नुसार मानवी हक्क व बाल हक्काचे उल्लंघन केल्याचा कोणताही पूर्वेतिहास नसलेली कोणतीही व्यक्ती अध्यक्ष किंवा सदस्य म्हणुन नियुक्ती करण्यास पात्र असेल, असे अपेक्षित आहे.
(३) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावरील अध्यक्ष व सदस्य यांची शिफारस शासनास करण्याकरिता त्रिसदस्यीय निवड समिती शासन निर्णय दि. २० जुलै, २०१६ अन्वये गठित करण्यात आली होती. सदर निवड समितीने विभागामार्फत शासन स्तरावर प्राप्त अध्यक्ष व सदस्य यांच्या अर्जाच्या पात्र-अपात्रतेची शहानिशा करुन, अधिनियमातील तरतुदीनुसार, आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यपदी नियुक्ती केली आहे.
(४) व (५) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्त करण्यात आलेल्या अध्यक्षांवर बीड जिल्हयामध्ये दि.०६.०४.२०१४ रोजी पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गु.र.नं.६१/२०१४ कलम १४३,१४७,१४९,३५३,३३२ भां.द.वि सह कलम ७ क्रि.ला. अ.का. १३५ मु.पो. का. प्रमाणे गुन्हयाची नोंद असुन, सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

नागपूर येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात सुपर रुग्णालय प्रतिक्षालयाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(२२) ८९३५९ (११-०८-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात सुपर रुग्णालय प्रतिक्षालयाचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाकडे प्रलंबित असल्याची माहिती माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोटरी क्लब ऑफ इशान्य नागपूरने सुपर स्पेशालिटीत प्रतिक्षालय बांधून देण्याचा प्रस्ताव पाठविला होता व याचा संपूर्ण खर्च रोटरी क्लब करणार आहे तरीही या प्रस्तावाला शासनाकडून मान्यता न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०२-११-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) शासन पत्र क्रमांक : जीएसएन-२०१६/प्र.क्र.०४/प्रशा-१, दिनांक ११-०७-२०१६ अन्वये सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील १६५ अंगणवाड्यांना स्वत:च्या मालकीच्या इमारती नसल्याबाबत

(२३) ८९६६९ (२१-०८-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील १६५ अंगणवाड्यांना स्वत:च्या मालकीच्या इमारती नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर अंगणवाड्यांना स्वत:च्या मालकीच्या इमारती बांधून मिळाव्यात म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) :(१) होय. हे अंशत: खरे आहे.

श्रीगोंदा तालुक्यात एकूण ३७१ नियमित अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. त्यापैकी २७१ अंगणवाडी केंद्रांना स्वत:च्या इमारती आहेत. उर्वरित १०० अंगणवाडी केंद्रांना स्वत:च्या इमारती नाहीत. सदर १०० अंगणवाडी केंद्र हे खालील नमूद जागेत भरतात.

(अ) भाडोत्री जागेत - ६०

(आ) जिल्हा परिषदेच्या शाळा खोल्यामध्ये - ३४

(इ) ग्रामपंचायत इमारतीमध्ये - ६

एकूण - १००

(२) सन २०१७-१८ याकरीता तालुक्यात ३० अंगणवाडी इमारत बांधकामाचे प्रस्ताव प्राप्त आहेत. अंगणवाडी इमारत बांधकामांना जागा उपलब्ध असल्यास मंजूरी देण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामीण आदिवासी भागात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गतच्या सुमारे २८३९० अंगणवाडयांना इमारत नसल्याबाबत

(२४) ८९७०३ (१६-०८-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण आदिवासी भागात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत एकूण ४४९ प्रकल्प कार्यरत असून या अंतर्गत ८१८३६ अंगणवाडी केंद्र कार्यान्वित आहेत यातील सुमारे २८३९० अंगणवाडयांना इमारत नसल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू अंगणवाड्यांना केंद्र मंदिर किंवा सार्वजनिक इमारतीत कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने काही धोरण निश्चित केले आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) काही अंगणवाडी केंद्र शासकिय इमारती उपलब्ध नसल्याने समाज मंदिर, प्राथमिक शाळेतील रिकाम्या खोलीत तसेच भाडयाच्या जागेत कार्यरत आहेत.
(३) होय केले आहे.

ज्या अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती नाहीत परंतु बांधकामाकरिता जागा उपलब्ध आहे अशी अंगणवाडी केंद्र विविध निधी अंतर्गत प्राप्त होणाऱ्या तरतूदीमधून बांधण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच शिक्षण विभागाच्या समन्वयाने गाव पातळीवरील प्राथमिक शाळेतील वापरात नसलेल्या खोल्या अंगणवाडीसाठी ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (मेयो) येथे बांधण्यांत आलेल्या वस्तीगृहाला निधी उपलब्ध असतांना अद्याप फर्निचर खरेदी न झाल्याबाबत

(२५) ८९९०६ (१९-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (मेयो) येथे १५ कोटी रुपये खर्च करून बांधण्यांत आलेल्या वस्तीगृहाला निधी उपलब्ध असतांना अद्याप फर्निचर खरेदी न झाल्याचे दिनांक ५ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर वस्तीगृहाकरीता फर्निचर खरेदी विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यासंबंधीची चौकशी करुन शासनाने पुढे कोणती कार्यवाह केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीष महाजन (०३-११-२०१७) :
(१) हे खरे नाही, त्या दरम्यान नागपूर सुधार प्रन्सास तर्फे सदर खरेदीची प्रक्रिया अंतीम टप्प्यात होती. दिनांक ३०-०३-२०१७ रोजी पुरवठादार कंपनीला कार्यादेश देण्यात आले आहेत. यामधून ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हयातील २१६१ अंगणवाडया असून त्यापैकी अद्यापही २६३ अंगणवाडयांना इमारत नसल्याबाबत

(२६) ८९९२२ (२१-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील २१६१ अंगणवाडया असून त्यापैकी अद्यापही २६३ अंगणवाडयांना इमारत नसल्याचे दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंगणवाडयाच्या इमारतीचे शासन तातडीने बांधकाम सुरु करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) : (१) होय.

(२) माहे ऑगस्ट, २०१७ नुसार २४१ अंगणवाडयांना इमारती नाहीत. अंगणवाडी इमारतीसाठी जागा उपलब्ध झाल्यानंतर बांधकामे हाती घेण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात खाजगी मेडिकल कॉलेजांकडून पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या जागासाठी अवाजवी फी आकारण्यात येत असल्याच्या पालकांच्या तक्रारीबाबत

(२७) ८९९६९ (२२-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मेडिकल कॉलेजनी यंदा शुल्कात तब्बल ८० टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला असून या फी वाढ विरोधात मा. वैद्यकिय शिक्षण मंत्री यांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पालकांनी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात, खाजगी मेडिकल कॉलेजांकडून पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या जागासाठी अवाजवी फी आकारण्यात येत असल्याच्या पालकांच्या तक्रारीनुसार वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाने फी नियंत्रण समितीने ठरवून दिलेल्या फी पेक्षा जास्त आकारणी केलेल्या मेडीकल कॉलेजांची मान्यता काढून घेणे, तसेच आर्थिक दंड आकारण्याचा निर्णय डिएमईआरने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांची स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-१२-२०१७) : (१)हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३)प्रश्न उद्भवत नाही.

(४)प्रश्न उद्भवत नाही.

वर्धा जिल्हयातील आर्वी विधानसभा क्षेत्रातील शेतक-यांना पिक विमा मिळण्याबाबत

(२८) ९१४८५ (२२-०८-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील शेतक-यांनी खरीप व रब्बी हंगाम २०१६-१७ या आर्थीक वर्षामध्ये विम्याचा हप्ता भरून सहभाग नोंदविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,मागील वर्षी आणि यावर्षी शेतक-यांचे नुकसान होऊन सुध्दा अद्यापही एकाही शेतक-यांना पिक विम्याचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,जर शेतक-यांनी पिक विम्याचे हप्ते भरले असेल तर त्यांना पिक विम्याचा लाभ मिळायलाच पाहिजे अशी मागणी शेतक-यांनी केलेल्या मागणीला अनुसरून लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांना दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (१४-११-२०१७) : (१) होय

(२) राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप - रब्बी २०१५-१६ व प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप व रब्बी २०१६-१७ मध्ये वर्धा जिल्हयातील सहभागी व पात्र शेतकऱ्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

हंगाम	सहभागी क्षेत्र	विमा संरक्षित क्षेत्र	पात्र शेतकरी संख्या	नुकसान भरपाई रक्कम रुपये (लाख)
खरीप २०१५	९१५२	११५५५	२९७९	९९.४१
रब्बी २०१५-१६	११६८	१९५४	१९७	९.७७
खरीप २०१६	९६१७७	१०८३५३	३५८	२१.२४
रब्बी २०१६-१७	३४४०	४६४८		नुकसान भरपाई निश्चित करण्याची कार्यवाही विमा कंपनीमार्फत सुरु आहे.

(३) होय.

(४) प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आली असून रब्बी हंगाम २०१६-१७ अंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करण्याची कार्यवाही विमा कंपनीमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील खारफुटीवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी कांदळवन समिती गठीत करण्याबाबत

(२९) ९१५१४ (२१-०८-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३२९ मधील प्रश्न क्रमांक ७४४८९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील खारफुटीवरील अतिक्रमण आणि त्यांचे संवर्धन करण्यासाठी मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशानुसार स्थापन केलेल्या कांदळवन संरक्षण समितीची गेल्या दोन महिन्यांपासून एकही बैठक झाली नसल्याचे तसेच खारफुटीवरील अतिक्रमणांबाबत सर्वसामान्यांना तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा. उच्च न्यायालयांने दिलेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी,ठाणे यांच्याकडून कोणतीही कार्यवाही न करता मा. न्यायालयाच्या आदेशांची अवहेलना करुन समितीतील काही व्यक्तींना समितीवर नियुक्त करण्यात आल्याबाबतचे पत्रही अद्याप दिले नसल्याचे दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन मा. न्यायालयाचे निर्देशांचे पालन न करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-११-२०१७) : (१) ठाणे जिल्ह्याकरिता स्वतंत्र कांदळवन संरक्षण समिती स्थापन करण्याचे आदेश मा.उच्च न्यायलयाने दिलेले नाहीत. परंतू जिल्हाधिकारी, ठाणे यांनी ठाणे जिल्ह्यातील कांदळवन संरक्षणार्थ सभा आयोजित केलेली होती. तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून सर्वसामान्यांना तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक १०७७ दुरध्वनी क्र. ०२२-२५३६८१८८६ व ई-मेल collectorofficethane@ gmail.com उपलब्ध करुन दिलेला आहे.
(२) कांदळवनाच्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयातील आवक जावक विभागात पाणथळ तक्रार निवारण कक्ष उभारण्यात आलेला आहे. तसेच ठाणे तालुक्यामध्ये

महानगरपालिका निहाय दिनांक २९.४.२०१७ अन्वये समिती गठीत करण्यात आलेली असून महानगरपालिकेतील प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने तहसिलदार, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन सनियंत्रण समितीची बैठक घेण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

देवरुख (ता.संगमेश्वर ,जि.रत्नागिरी) राज्य परिवहन आगार येथील समस्यांबाबत

(३०) ९१६०३ (१४-०८-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरुख (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) राज्य परिवहन आगार येथे बसेसची कमतरता, चालक-वाहक रिक्त पदे, डिझेल व वर्कशॉप करीता सुट्या भागांचा अनियमित पुरवठा तसेच बसस्थानक परिसरांतील स्वछतागृहाची दुरवस्था आदी समस्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर बसस्थानकातील उपरोक्त समस्यांमुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर समस्या दूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१७) :(१), (२) व (३) देवरुख आगारामार्फत ८७ नियते चालविली जातात, त्यासाठी ८९ बसेस उपलब्ध असून, चालनिय नियतांसाठी बसेसची कमतरता नाही.

तसेच, आगारात २०२ चालक/वाहकांची आवश्यकता आहे. मात्र १६५ चालक व १२९ वाहक उपलब्ध असून ९७ चालक व ७३ वाहकांची कमतरता आहे. राज्य परिवहन महामंडळाद्वारे चालक तथा वाहक या पदाची भरती प्रक्रिया सुरु केली आहे. सुट्या भागांचा पुरवठा नियमित असून त्यांचे दरकरार वितरीत करुन आवश्यकतेनुसार विभागाकडून सुट्या भागांची खरेदी केली जाते. बसस्थानक व प्रसाधनगृहाची दैनंदिन स्वच्छता व देखभाल केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हत्तीरोगाचे सर्वाधिक रुग्ण जळगांव व नाशिक जिल्ह्यात आढळून आल्याबाबत

(३१) ९१६९२ (२१-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागात डासांमार्फत प्रसार होणा-या हत्तीरोगाचे सर्वाधिक रुग्ण जळगांव व नाशिक जिल्ह्यात आढळून आल्याने या रोगाच्या निर्मुलनार्थ दिनांक ५ जून, २०१७ रोजी विशेष मोहिम राबविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोहिमेंतर्गत हत्तीरुग्णाचे प्रमाण कमी करण्यासाठी कोणती विशेष उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (३१-१०-२०१७) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

नाशिक विभागातील जळगाव व नाशिक या जिल्हयांमध्ये हत्तीरोगाच्या निर्मुलनार्थ दि. ५ जून, २०१७ रोजी "जागतिक हत्तीरोग दिन" साजरा करण्यात आला. परंतु ही विशेष मोहिम म्हणून राबविण्यात आली नसून दरवर्षी हा दिवस "जागतिक हत्तीरोग दिन" म्हणून साजरा करण्यात येतो.

सन २०१६ अखेर जळगाव जिल्हयातील अंडवृध्दी रुग्णसंख्या १११ व हत्तीपाय रुग्णसंख्या १३२ असून नाशिक जिल्हयातील अंडवृध्दी रुग्णसंख्या ३ व हत्तीपाय रुग्णसंख्या १२४ अशी आहे. हे सर्व रुग्ण जुनेच असून नवीन एकही रुग्ण आढळून आलेला नाही.

(२) हत्तीरोग दुरीकरणासाठी शासन स्तरावरुन नियमित स्वरुपात खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात आल्या व येत आहेत :-

* हत्तीरोग नियंत्रण पथक, हत्तीरोग सर्वेक्षण पथक व रात्रचिकित्सालय यांच्यामार्फत रात्रीच्या वेळी लोकसंख्येच्या १० % रक्त नमुन्यांचे सर्वेक्षण केले जाते.

* दुषित हत्तीरोग रुग्णांना त्वरीत औषधोपचार करण्यात येतो.

* डासोत्पत्ती स्थानांवर अळीनाशकाची फवारणी करण्यात येते, तसेच डबकी बुजविणे, वाहती करणे, व्हेंट पाईपांना जाळया बसविणे, या उपाययोजना केल्या जातात.

* जीवशास्त्रीय उपाययोजनेंतर्गत गप्पीमासे पैदास केंद्राची निर्मिती करुन योग्य अशा डासोत्पत्ती स्थानांमध्ये अळीभक्षक गप्पीमासे सोडण्यात येतात.

* किटक समांहारकांमार्फत किटकशास्त्रीय सर्वेक्षण नियमितपणे करण्यात येते.

* हत्तीपाय रुग्णांच्या बाधित अवयवांची देखभाल व निगा राखण्यासाठी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण प्रत्येक रुग्णाला दिले जाते.

* अंडवृध्दी रुग्णांची शस्त्रक्रिया करण्यासाठी जिल्हा रुग्णालयात शिबिरांचे आयोजन केले जाते.

* दरवर्षी दि. १६ व ३१ ऑगस्ट या कालावधीत हत्तीरोग रुग्ण शोध मोहिम राबविण्यात येते.

* हत्तीरोग दुरीकरणासाठी दरवर्षी हत्तीरोग प्रवण भागात सामुदायिक औषधोपचार मोहिम (MDA) राबविण्यात येते.

* हत्तीरोगाविषयी आरोग्य कर्मचारी व प्रसिध्दी माध्यमे यांचेमार्फत जनतेस आरोग्य शिक्षण देण्यात येते.

* जळगाव जिल्हयामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार हत्तीरोग दुरीकरण पडताळणी सर्वेक्षण (TAS- Transmission Assessment Survey) हे दि. ०२ ते ०९ एप्रिल, २०१४ व दि. ०७ ते ०९ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत करण्यात आले होते. यातील निष्कर्षावरुन जळगाव जिल्यामध्ये हत्तीरोग दुरीकरण झाल्याचे केंद्र शासनाने घोषित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांचे मानधन मिळेपर्यंत अहवालावर बहिष्कार घालण्याचा निर्णय

(३२) ९१८९३ (२१-०८-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या मानधन वाढीबाबत मा.महिला व बालविकास मंत्री, विभागाचे सचिव, वित्त व नियोजन विभागाचे सचिव व महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे पदाधिकारी यांची बैठक दिनांक ६ जून २०१७ रोजी घेण्याचे आश्वासन देण्यात आल्याची माहिती दिनांक १ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने बैठकीत मानधन वाढीचा निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) : (१) होय.

(२) सेविकांचे मानधन वाढविण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर गठित केलेल्या समितीच्या शिफारशीनुसार मानधन वाढविण्याबाबतचा प्रस्ताव वित्त व नियोजन विभागास सादर करण्याबाबत बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

(३) व (४) दिनांक ०६/०६/२०१७ रोजी अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक झाली. सदर बैठकीत अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीबाबत चर्चा झाली. मानधन वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील आदिवासीबहुल भागात अद्यापही सिंचनाच्या प्रभावी सुविधा नसल्याबाबत

(३३) ९२००९ (१९-०८-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील आदिवासीबहुल भागात अद्यापही सिंचनाच्या प्रभावी सुविधा नसून या भागात तलाव व कोल्हापुरी बंधा-यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाव व बंधा-यांच्या दुरुस्तीवर जलयुक्त शिवार अभियानांतर्गत लाखो रुपये खर्च करण्यात आले परंतु बहुतांश कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागात सिंचनाच्या प्रभावी सुविधा निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

प्रा. राम शिंदे (१३-११-२०१७) : (१) होय.
(२) नाही.
(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत लघु सिंचन विभाग जिल्हा परिषद नागपूर मार्फत सन् २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये रामटेक तालूक्यातील लघु सिंचन/माजी मालगुजारी तलाव दुरूस्ती-१०, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे/साठवण बंधारे दुरूस्ती-३६ व नालाखोलीकरण/रूंदीकरण-४४, माजी मालगुजारी तलाव खोलीकरण व गाळकाढणे-६, नविन साठवण बंधारे बांधकाम-५ व सिमेंट नालाबांधकामें-११, अशी एकूण ११२ कामें करण्यात आलेली आहेत. या सर्व कामांमूळे ३०३८ स.घ.मी.पाणी साठा क्षमता निर्माण झाली असून त्यापासून ८७९ हेक्टर सिंचन क्षमता पूर्नस्थापित झालेली आहे. ही सर्व कामें शासनाचे विहीत मापदंड व गुणवत्ता राखूनच पूर्ण करण्यात आलेली आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

शहादा (जि नंदुरबार) येथील नवीन बसस्थानकात डेपो स्थलांतरित करण्याबाबत

(३४) ९२२२४ (१४-०८-२०१७). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहादा (जि नंदुरबार) येथे राष्ट्रीय परिवहन मंडळाने सन १९९५ मध्ये सव्वा कोटी रुपये खर्च करुन नवीन बस डेपोची उभारणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन जागेवर डेपो स्थलांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) : (१) होय.
(२) शहादा येथे नवीन बांधण्यात आलेल्या बसस्थानकावरुन दि.२६ मे, १९९८ ते दि.१८ जानेवारी, १९९९ च्या कालावधीत काही प्रमाणात वाहतूक सुरु करण्यात आली होती. परंतू, प्रवाशांची होणारी गैरसोय व महामंडळाचे होणारे नुकसान इ. बाबी विचारात घेता नवीन बसस्थानकावरुन वाहतूक स्थगित करुन दि. १८ जानेवारी, १९९९ पासून जुन्या बसस्थानकावरुन पुर्ववत सुरु करण्यात आली आहे. नवीन बसस्थानकाची जागा विनावापर पड़ून आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रावेर (जि.जळगाव) येथील काही गावांचे पुनर्वसन रखडलेले असल्याबाबत

(३५) ९२३६२ (१६-०८-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) येथील काही गावांचे पुनर्वसन रखडलेले असल्याचे माहे जून-२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) धुरखेडा (ता.रावेर) येथील ४० घरांचे पुनर्वसन रखडलेले असून या ४० घरांच्या जागेसाठी मंजुरी असूनही त्यांना जागा उपलब्ध न झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती या गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न त्वरित सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२२-११-२०१७) : (१) होय.
(२) मौजे धुरखेडा ता.रावेर येथील ४० घरांच्या पुनर्वसनासाठी भूसंपादन करण्याबाबतचा प्रस्ताव होता.परंतू प्रस्तावित जमिन मालकांने मा.उच्च न्यायालयामार्फत जमीन संपादनास प्रतिबध्द करण्याचे आदेश प्राप्त केल्यामुळे भूसंपादन अधिकारी जळगाव यांनी नविन भूसंपान कायदयानुसार नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत कार्यकारी अभियंता जळगाव मध्यम प्रकल्प विभाग यांना कळविले आहे.
(३) सहायक अभिंयंता सरदार सरोवर उपविभागीय कक्ष क्र.२ भूसावळ यांनी मौजे थेरोळे येथील गट क्र.१२१ ही पुनर्वसनासाठी सुचित केली होती.तथापि मौजे थेरोळे येथील ग्रामस्थांनी गट नं.१२१ यावर कब्जेदारानी नावे लावण्यासाठी व सदरचा गट कुळाचा असल्याने पुनर्वसनासाठी न घेण्याबाबत निवेदन सादर केले होते.तद्अनुषंगाने तहसिलदार रावेर यांनी सदरचा गट सरकारच्या नावे असून सदर गट क्र.१२१ हा पुनर्वसनासाठी योग्य आहे किंवा कसे याबाबत पाटबंधारे विभागाकडून तांत्रीक तपासणी करून पुनर्वसन करण्याची तजविज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांनी डाटा एन्ट्री ऑपेरटर या करिता मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मध्ये झालेल्या अनियामितेबाबत

(३६) ९२५२३ (१४-०८-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांनी डाटा एन्ट्री ऑपेरटर या करिता मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी ई-निविदा क्र. २०१७ -MLDBA-२२८१९-१ दिनांक १ जून, २०१७ रोजी प्रसारित केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदेतील अटी/शर्ती अवास्तव व विशिष्ट हेतूने काढली गेली असल्याचे सबबीखाली निविदा सादर करणाऱ्यापैकी एकाने सदर गैर निवेदेबाबत तक्रार करून रद्द करण्याची मागणी केली असता निविदा प्रक्रियासाठी शुद्धिपत्रक प्रसिद्द करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) उक्त, पशुधन मंडळाचे कार्यकारी अधिकारी दिनांक ५ मे २०१७ रोजी पासून रजेवर असतांना निविदा प्रक्रिया बाबतच्या सर्व प्रक्रिया त्यांच्या डीजीटल स्वाक्षरीने केल्या सदर प्रकार हा सायबर क्राईम असल्याने चौकशी करून संबंधितांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करावे अशी मागणी निविदा सादर करणाऱ्याने केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०४-१२-२०१७) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) लागू नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

स्वतंत्र मृदु व जलसंधारण विभाग स्थापन करण्याबाबत.

(३७) ९२५५९ (१५-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने स्वतंत्र मृदु व जलसंधारण विभाग स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाचा सुधारीत आकृतीबंध तयार करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, मृद व जलसंधारण विभाग तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (१८-११-२०१७) :(१) होय, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २६/०९/२०१७ अन्वये मृद व जलसंधारण विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

(२) कृषि विभागाचा सुधारीत आकृतीबंध वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(३) मृद व जलसंधारण आयुक्तालयाच्या स्थापनेसह विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची फेररचना करण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन मृद व जलसंधारण आयुक्तालयाच्या स्थापनेसह विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची फेररचना करण्याबाबतचा शासन निर्णय मृद व जलसंधारण विभागाकडून दिनांक ३१ मे, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

तसेच कृषि विभागाच्या दिनांक १२/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मृद जलसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन शाखा, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा तसेच कृषि विभागातील इतर पदे अशी एकूण २१८१ पदे प्रथम टप्प्यामध्ये मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरीत करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

एस.टी. महामंडळाने विविध पदांसाठी १४ हजार २४७ कर्मचा-यांची भरती प्रक्रिया तातडीने होणेबाबत

(३८) ९२५७५ (१४-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एस.टी.महामंडळाने विविध पदांसाठी १४ हजार २४७ कर्मचा-यांची भरती करण्याचा निर्णय घेतल्याने अंतिम मुदतीपूर्व चार लाख ९७ हजार ७५३ अर्ज दाखल झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्ज प्राप्त होवून ४ महिने झाले तरी लेखी परिक्षा घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने भरती प्रक्रिया तातडीने होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०३-११-२०१७) : (१) होय.

(२), (३) व (४) चालक तथा वाहक पदाची लेखी परीक्षा दि.०२.०७.२०१७, तसेच, सहाय्यक (कनिष्ठ) पदाची लेखी परीक्षा दि.०९.०७.२०१७ व दि.३०.०७.२०१७ रोजी पार पडली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्हयातील लोणंद एसटी बसस्थानकातील समस्यांचे निवारण व प्रवाशांना सुविधा देण्याबाबत

(३९) ९२५८१ (१४-०८-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणंद (जि.सातारा) येथील एसटी बसस्थानकाची मोठी दुरवस्था झाली असून प्रवाशांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा मिळत नसल्यामुळे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या बसस्थानकातील समस्यांचे निवारण करण्याबाबत तसेच प्रवाशांना सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१३-११-२०१७) :

(१) व (२) लोणंद बसस्थानक सुस्थितीत असून, बसस्थानकावर ६ फलाट, वाहतूक नियंत्रण/चौकशी कक्ष, प्रतिक्षालय, आरक्षण, पिण्याचे पाणी, लाईट-पंखे, प्रसाधनगृह, आसन व्यवस्था इ. सोयी सुविधा उपलब्ध आहेत. तसेच, बसस्थानकाची व प्रसाधनगृहाची नियमित स्वच्छता करण्यात येत असून, प्रवाशांची कोणत्याही प्रकारची गैरसोय झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नेवासा (जि. अहमदनगर) तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाच्या कार्यालयासाठी पंचायत समितीच्या नविन इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

(४०) ९२६०७ (१४-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा तालुक्यातील (जि. अहमदनगर) पशुसंवर्धन विभागाच्या कार्यालयासाठी पंचायत समितीच्या नविन इमारतीमध्ये जागा उपलब्ध नसल्याने हे कार्यालय पशुवैद्यकिय दवाखान्यात सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती नेवासा तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाच्या कार्यालयासाठी पंचायत समितीच्या नविन इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (३०-११-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) पंचायत समिती नेवासा येथील नविन प्रशासकीय इमारतीच्या मंजुर आराखड्या प्रमाणे सदर इमारतीमध्ये पशुसंवर्धन विभागाच्या कार्यालयासाठी जागेची तरतूद नसल्याने त्याठिकाणी या विभागाकरीता बैठक व्यवस्था करण्यात आलेली नाही. सबब, तात्पुरती व्यवस्था म्हणून सदरचा पशुसंवर्धन विभाग नेवासा येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ या इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेला होता.

परंतु सदर ठिकाण त्या कार्यकक्षेतील लाभार्थी तसेच नागरिकांना गैरसोईचे होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे आता नेवासा येथील पंचायत समितीच्या जुन्या प्रशासकीय इमारतीमध्ये पशुसंवर्धन विभागासाठी स्वतंत्ररीत्या जागा उपलब्ध करुन दिलेली आहे.

सद्यस्थितीत दिनांक ११/०९/२०१७ पासुन पशुसंवर्धन विभाग पंचायत समितीच्या आवारामधील जुन्या प्रशासकीय इमारतीमध्ये कार्यान्वित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नेवासा (जि. अहमदनगर) बसस्थानकांतील समस्या तातडीने सोडविण्याबाबत

(४१) ९२६३४ (१४-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि. अहमदनगर)बसस्थानकांत कॅन्टीन, शौचालय, हॉकर्स लायसन्स, पथदिवे, वाहन पार्किंग तसेच सीसीटीव्ही ची समस्या असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती नेवासा बसस्थानकांतील या समस्या सोडविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) : (१), (२) व (३) नेवासा बसस्थानकावर दि.१२.०७.२०१७ पासून उपहारगृह सुरु करण्यात येवून, ४ फिरते परवाने देण्यात आले आहेत. बसस्थानकावरील प्रसाधनगृह मोडकळीस आले असल्याने, नवीन प्रसाधनगृह बांधण्यात येत असून, ७५ टक्के काम पुर्ण झाले आहे. बसस्थानकावरील पथदिवे सुरु आहेत. तसेच, सीसीटीव्ही बसविणेबाबतची निविदा मागविण्यात आली आहे.

बसस्थानकावर वाहनतळासाठीची जागा अपुरी असल्याने, सदर ठिकाणी पार्क करण्यात आलेली खाजगी वाहने त्वरीत बाहेर काढण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात आयुर्वेद औषधांचा अभ्यास करणा-या बीएएमएस विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाबाबत

(४२) ९२८८४ (२१-०८-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आयुर्वेद औषधांचा अभ्यास करणा-या बी.ए.एम.एस. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकात मुल जन्माला कशी येतात यांची माहिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभ्यासक्रमाच्या पुस्तकातील रेसिपीला चरक संहितेतून घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अभ्यासक्रमामुळे बी.ए.एस.एस.चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मत भिन्नता असल्याने या धड्याबाबत शासनाच्या वैद्यकिय शिक्षण विभागाने पुनर्विचार करावा अशी मागणी विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-१२-२०१७) : (१) होय, हे खरे आहे. सदर माहिती स्त्रीरोग व प्रसुतीतंत्र या विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये येते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) आयुर्वेद अभ्यासक्रम हा भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली यांनी ठरविलेला असल्याने त्याबाबत कोणताही बदल करण्याचा अधिकार फक्त उक्त परिषदेलाच आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या दिनांक ३१/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये आयुर्वेद अभ्यासक्रमातील पुसंवन विधीचा पुन:र्विचार करण्याबाबत भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्हयात अंगणवाडयांना स्वत:ची इमारत नसल्याबाबत

(४३) ९३१३० (११-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयात अंगणवाडयांना स्वत:ची इमारत नसल्याने ६०० ठिकाणी समाज मंदिरासह खाजगी जागेत अंगणवाडयांचे वर्ग भरले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७-१८ या वर्षासाठी अंगणवाडयांच्या बांधकामासाठी राज्य शासनाने किती निधी मंजूर केला आहे,
(३) असल्यास, त्यापैंकी किती अंगणवाडयांना निधी देण्यात आलेला आहे,
(४) नसल्यास. विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१२-२०१७) : (१) नाही.
(२) सन २०१७-१८ वर्षाकरीता जिल्हा नियोजन समितीने नविन अंगणवाडी बांधकामाकरीता निधी मंजूर केलेला नाही. अंगणवाडी बांधकामासाठी जागा उपलब्ध आहे काय याची माहिती घेण्यात येत आहे. जागा उपलब्ध असल्यास निधीची तरतूद करण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील एसटी महामंडळ तोटयात असल्याबाबत

(४४) ९३१४३ (१४-०८-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अधिका-यांना वाहतूकीचा अनुभव नसल्यामुळे एसटी महामंडळ तोटयात चाललेली असल्याचा अहवाल "कॅग" ने माहे एप्रिल, २०१७ मध्ये राज्य शासनाला सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एसटी महामंडळातील वाहनचालक व वाहक यांचे वेतनही वेळेवर होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॅगच्या अहवालाच्या अनुषंगाने राज्य शासनाने एसटी महामंडळाला नफा होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) : (१) व (२) नाही.

(३) राज्य परिवहन महामंडळाचा तोटा कमी करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

१. भाडे तत्त्वावर वातानूकुलीत बसेस घेण्याचे योजिले आहे.
२. भारमान पातळीत किमान २ अंकानी वाढ करुन ७१.६० अंकाचे उद्दीष्ट.
३. शेतकरी बांधवांना त्यांच्या शेतीमालास मुबलक अशी जागा असणाऱ्या नवीन बसेसची संख्या वाढविण्यात येत आहे.
४. ग्रामीण भागामध्ये ७० पेक्षा कमी भारमान असणाऱ्या नियतांवर मिडी बस चालविण्याचे नियोजन.
५. राज्य भरात सद्या अस्तित्वात असलेल्या ४१ बस स्थानकांचे कायापालट तसेच पुनर्बांधणी करण्याकरीता ३० आर्किटेक्ट यांची नेमणूक करणे.
६. १०० मालवाहतूक ट्रक नव्याने चालनात आणण्याचे प्रस्तावित आहे.
७. राज्य परिवहन प्रवासी व उत्पन्नात वाढ होण्याकरीता राज्य परिवहन महामंडळामध्ये दि.०१.०१.२०१७ ते दि.३१.०३.२०१७ पर्यंत प्रवासी वाढवा विशेष अभियान राबविण्यात आले.
८. प्रवाशांना राज्य परिवहन बसेसच्या वेळापत्रकाची माहिती मिळण्याकरीता मोबाईल ॲप तयार करण्यात आले आहेत.
९. राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये वाय-फाय सुविधा, प्रवाशांच्या माहितीकरीता बसस्थानकांवर व्ही.टी.एस./पी.आय.एस. द्वारे माहिती दिली जाणार.
१०. राज्य परिवहन महामंडळातील वेळापत्रक तसेच इतर अडचणी सोडविण्याकरीता कॉल सेंटर अंमलात आणण्यात येणार.

११. राज्य परिवहन सवलतप्राप्त प्रवाशांकरीता स्मार्ट कार्ड देण्यात येणार.
१२. पेटीएम व अन्य तीन संस्थांना ई-व्हॉलेट व पेमेंट गेटवे बाबत नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच आरक्षण केंद्रामध्ये स्वाईप मशिनद्वारे तिकीट आरक्षणाची सुविधा करणे.
१३. दिवाळी हंगाम व इतर सणांच्या कालावधीत लवचीक भाडे आकारणी करुन सन २०१६ च्या दिवाळी हंगामात रु.२८ कोटीचे अतिरिक्त उत्पन्न.
१४. विना वाहक व शटल फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली असून, प्रवाशांना मुबलक सेवा पुरविणे शक्य झाले आहे.
१५. संगणीकृत चालक, वाहक कामगिरी व बसेसचे चालन करण्यात येवून उत्पादकतेत वाढ करणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तालुका कृषी अधिकारी कार्यालय राळेगांव (जि.यवतमाळ) येथील अनेक महत्वाची पदे रिक्त असल्याबाबत

(४५) ९३१९७ (१५-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुका कृषी अधिकारी राळेगांव अंतर्गत मंडळ कृषी अधिकारी तंत्रज्ञ कृषी सहायक अशी अनेक पदे रिक्त असल्याचे दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी उपयोजनेमध्ये समावेश असलेल्या राळेगांव तालुक्यामध्ये अपु-या कर्मचा-यामुळे शासनाच्या विविध योजना शेतक-यांपर्यंत पोहचत नसल्याचेही निर्देशनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुका कृषी कार्यालया अंतर्गत रिक्त पदाचा अनुशेष भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (२८-११-२०१७) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

तालुका कृषी अधिकारी राळेगाव जि.यवतमाळ अंतर्गत मंडळ कृषी अधिकाऱ्यांची २ पदे, कृषी पर्यवेक्षकांची २ पदे व कृषी सहाय्यकांच्या ७ पदांसह इतर १८ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

राळेगांव तालुक्यातील जळका, वाटखेड, पळसकुंड, सावरखेडा, पिंप्री दुर्ग, वरध, लोणी व सखी ही मुख्यालये आदिवासी उपयोजनेअंतर्गत येतात. यापैकी जळका, पळसकुंड, रिंधोरा, झाडगांव व सावरखेडा ही मुख्यालये रिक्त असून सदरील मुख्यालयांचा अतिरिक्त पदभार इतर कृषि सहाय्यकांकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यात येत आहेत.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील ५० पदांची शिफारस शासनास सादर केली असून शिफारसपात्र उमेदवारांना दि.१० नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार नियुक्तीपत्रे देण्यात आलेली आहेत. त्याव्यतिरिक्त गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या ७९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे. गट-ब कनिष्ठ संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील १०२ पदांवर पदोन्नतीद्वारे पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु आहे.

कृषि सहाय्यक संवर्गातील आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांचा आढावा घेवून प्रचलित शासन नियमानुसार पदभरतीची कार्यवाही विभागीय कृषी सहसंचालक स्तरावर सुरु करण्यास सूचित केलेले आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दि. २५.०५.२०१७ अन्वये प्रशासकीय विभाग आकृतिबंध अंतिम मंजूर करुन घेणार नाहीत, तोपर्यंत त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही. विभागातील पदांचा आढावा घेवून कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतीम करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतिबंध अंतीम झाल्यानंतर गट-क मधील कृषि आयुक्तालयातील तसेच अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील लिपिक, वरिष्ठ लिपिक, सहा. अधिक्षक, अनुरेखक, वाहनचालक व लघुटंकलेखक, लघुलेखक(निम्नश्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी) या संवर्गाची पदे निश्चितीनंतर त्या संवर्गाची पदे नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे स्तरावर प्रचलित नियमानुसार भरण्याची कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाड (जि.रायगड) एस.टी. आगारातील विहिरीवर बसविलेला मोटारपंप नादुरुस्त झाल्याबाबत

(४६) ९३२४९ (१४-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड एस.टी. आगारातील विहिरीवर बसविलेला मोटारपंप नादुरुस्त झाल्यामुळे आगारातील कर्मचारी व प्रवाशी पाण्यावाचून वंचित असल्याचे नुकतेच माहे जून,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानकातील स्वच्छतागृह पाण्याअभावी बंद ठेवण्यात आली होती हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०३-११-२०१७) : (१), (२), (३) व (४) महाड आगारातील विहिरीवर बसविण्यात आलेला मोटार पंप दि.२०.०६.२०१७ रोजी नादुरुस्त झाला होता. सदर मोटार पंपाची तात्काळ दुरुस्ती करुन दुसऱ्या दिवशी दि.२१.०६.२०१७ रोजी कार्यान्वित करुन पाणीपुरवठा सुरळीत सुरु करण्यात आला आहे. सदर घटनेस कोणीही जबाबदार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची सेवा इतर राज्यांच्या तुलनेने अत्याधुनिक सुविधा पुरविण्यास कमी पडत असल्याबाबत

(४७) ९३४८९ (१४-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची सेवा इतर राज्यांच्या तुलनेने मागे असल्याचे राज्य परिवहन मंडळाच्या वेतन सुधारणा समितीने केलेल्या निरिक्षणातून व्यक्त केले असल्याचे माहे जुलै २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर राज्यात परिवहन सेवेकडे जीपीएस यंत्रणेसह उद्घोषणा, डिस्प्ले बोर्ड, मोबाईल ॲप, नियंत्रण कक्ष अशा अत्याधुनिक सुविधांच्या तुलनेने महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ अत्याधुनिक सुविधा पुरविण्यास कमी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक सुविधा पुरविण्यास राज्य परिवहन मंडळ कमी पडत असल्याने प्रवाशांनीही दुर्लक्ष केल्यामुळे राज्य परिवहन मंडळाच्या उत्पन्नातही घट होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रवाशांना अत्याधुनिक सेवा पुरविण्याबाबत व सुसज्ज बस आगार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०३-११-२०१७) : (१), (२) व (३) नाही.

राज्य परिवहन प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी मोबाईल ॲपद्वारे तिकीट आरक्षण करण्याची सुविधा पुरविण्यात आली आहे. सदयस्थितीत राज्य परिवहन महामंडळाच्या १४० बसस्थानकांवर संगणकीय उद्घोषणा यंत्रणा बसविण्यात आली आहे. राज्य परिवहन बसेसमध्ये व बसस्थानकांवर व्ही.टी.एस. व पि.आय.एस. प्रणाली बसविण्याबाबत परवानाधारकाची नेमणूक करण्याकरिता निविदा मागविण्यात आलेली आहे.

तसेच, राज्य परिवहन महामंडळ प्रवाशांना वेगवेगळया सुविधा नियोजनपूर्वक पुरवित आहे. जेणेकरुन प्रवासी राज्य परिवहन महामंडळाकडे आकर्षित होतील. राज्य परिवहन महामंडळ प्रवाशांना सेवा पुरविण्यास कमी पडत नाही. त्यामुळे प्रवाशांनी दुर्लक्ष केल्याने महामंडळाच्या उत्पन्नात घट होत नाही.

(४) प्रवाशांना अत्याधुनिक सेवा पुरविण्याच्या दृष्टीनेच व्ही.टी.एस. व पि.आय.एस प्रणाली बसविण्यासाठी निविदा मागवण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे अधिक आरामदायी अशा १५०० शिवशाही बसेस राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात टप्प्याटप्प्याने समाविष्ट करण्यास सुरुवात झाली आहे. तसेच, राज्य परिवहन बसस्थानके, आगार परिसर यांची स्वच्छता एकात्मिक सुविधा व्यवस्थापनाद्वारे करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

इचलकरंजी (जि.कोल्हापूर) आगाराच्या एस टी बसेसमध्ये प्रवाशांच्या सुविधेसाठी असणा-या प्रथमोपचाराच्या पेटया रिकाम्या असल्याबाबत

(४८) ९३६१३ (१४-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) आगाराच्या एस टी बसेसमध्ये प्रवाशांच्या सुविधेसाठी असणा-या प्रथमोपचाराच्या पेटया रिकाम्या असल्याचे नुकतेच माहे जुलै.,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एस टी आगारातील बसेसमधील प्रथमोपचार साहित्य न बसवता त्याची परस्पर विल्हेवाट लावण्यात येत असलेल्यावर कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे नागरिक सुरेश मल्लिकार्जून वास्ते यांनी मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार आगारातील प्रथमोपचाराच्या पेटया हददपार करण्यास कारणीभूत असणा-या दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०३-११-२०१७) : (१) याबाबत दि.२८.०६.२०१७ राजीच्या दै.पुढारी वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) व (३) होय. तथापि, चुकीच्या माहितीच्या आधारे निवेदनात मागणी केल्याचे चौकशीत आढळून आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ अंतर्गत शिरगांव (रत्नागिरी) येथे कार्यरत असलेले मत्स्य विज्ञान महाविद्यालय नागपूर येथे स्थलांतरीत करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत

(४९) ९४२९१ (१५-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ अंतर्गत शिरगांव (रत्नागिरी) येथे कार्यरत असलेले मत्स्य विज्ञान महाविद्यालय नागपूर येथे स्थलांतरीत करण्यात येणार असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत एका राजकीय पक्षाने विरोध करून या संदर्भातील निवेदन शासनास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू महाविद्यालय नागपूर येथे स्थलांतरीत करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त महाविद्यालय स्थलांतरीत करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

श्री. महादेव जानकर (१५-११-२०१७) : (१) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ अंतर्गत असलेले शिरगांव (रत्नागिरी) येथील मत्स्य विज्ञान महाविद्यालय महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ च्या कलम ६२ (ब), तसेच सदर अधिनियमा-सोबतच्या अनुसूची - अ (६) नुसार महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांच्याकडे वर्ग (हस्तांतरीत) करण्यात आले होते.

तथापि, दिनांक १७/१०/२००० च्या अधिसूचनेन्वये उक्त अधिनियमात सूधारणा करुन शिरगांव येथील मत्स्य विज्ञान महाविद्यालय उक्त अधिनियमाच्या अनुसूचिमधून वगळण्यात आले आहे. सदर महाविद्यालय महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्याकडे वर्ग करण्याबाबत अद्याप शासन पातळीवरुन कोणताही निर्णय झालेला नाही.
(२) सदर मत्स्य महाविद्यालय महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्याकडे वर्ग करण्यात येवू नये अशी विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना दुबार पेरणीमुळे निर्माण झालेल्या संकटापासून दिलासा मिळण्याबाबत

(५०) ९४४३३ (१५-०८-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहे जून २०१७ पासून सुरु झालेल्या पावसात खंड पडल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर सद्यस्थितीत दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीअंती राज्यातील शेतकऱ्यांना दुबार पेरणीमुळे निर्माण झालेल्या संकटापासून दिलासा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (१४-११-२०१७) : (१) व (२) राज्यात दि.१ जून ते १८ ऑगस्ट या कालावधीतील सरासरी पाऊस ८०२ मि.मी. असून दि.१८ ऑगस्ट,२०१७ पर्यंत ५६१.८० मि.मी. म्हणजे सरासरीच्या ७० टक्के पाऊस झाला. तदनंतर राज्यामध्ये मान्सूनपूर्व व मान्सुनच्या पावसाची सुरुवात चांगली झाल्याने पेरणी मोठ्या प्रमाणात झाली. त्यानंतर माहे जून, जुलै व ऑगस्ट मध्ये पावसात खंड पडल्याने हलक्या जमिनीवरील पिके सुकू लागली, तर मध्यम व भारी जमिनीतील पिकांच्या वाढीकरीता देखील पावसाची नितांत आवश्यक असल्याने दुबार पेरणीची शक्यता निर्माण झाली होती. तथापि, माहे जुलैच्या तिस-या आठवड्यापासून तसेच माहे ऑगस्ट मध्ये देखील पावसाचे पुनरागमन झाल्याने पिकांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.